# कृष्ण

## हा कृष्ण आहे तरी कोण?

कृष्ण हे महाभारतातील सर्वात रोमांचक आणि रहस्यपूर्ण व्यक्तिमत्व आहे. जगभरातील विविध प्रकारचे असंख्य लोक कृष्णावर किती प्रेम करतात हे पाहून नवल वाटते! माझ्यासारखे नास्तिकही कृष्णाच्या प्रेमात पडतात! कृष्णाचं व्यक्तिमत्त्व खरंच लोभस आहे, लडिवाळ आहे, हवंहवंसं वाटणारं आहे. प्रेमिक, मित्र, राजनीतीज्ञ, सर्वप्रिय सखा अशी आणि इतर अनेक बलस्थानं त्याच्या व्यक्तिमत्वात आहेत. मानवी जीवनात आदर्श किंवा हव्याहव्याशा वाटणाऱ्या प्रत्येक गोष्टीचा मूर्त आविष्कार कृष्णामध्ये आढळतो – मग हे आदर्श बुद्धिजीवींचे असोत किंवा साध्याभोळ्या लोकांचे असोत. जगातील सर्व व्याधींवर कृष्ण हा उत्तम उपाय आहे.

मी स्वतः नास्तिक ("ईश्वर" या शब्दाच्या पारंपारिक परिभाषेत) असल्याने, मी कृष्णाला एक व्यक्ती मानतो – मग ती काल्पनिक असेल नाहीतर ऐतिहासिक सत्य. कृष्ण माझा आदर्श आहे, माझी प्रेरणा आहे, माझे श्रद्धास्थान आहे.

कृष्णाचे मूळ कुठे आहे, तो कुठून आला हे प्रश्न त्याच्या जीवनाइतकेच रहस्यमय आहेत. तो व्यासांच्या प्रतिभेतून जन्मला की त्याही पूर्वी पुराणातल्या कथांत प्रथम प्रकट झाला यावर तज्ज्ञांमध्ये मतभेद आहेत. तो एक वास्तव, ऐतिहासिक व्यक्ती होता की पूर्णतः काल्पनिक याबद्दलही मतैक्य नाही. पण या सर्व मतभेदांची किंवा वादांची मला फारशी पर्वा नाही. कृष्ण ऐतिहासिक व्यक्ती नसलेलाच मी अधिक पसंत करेन. कारण प्रत्येक माणसात काही दोष, काही तडे असतातच तसे कृष्णाच्याही व्यक्तीमत्वात असण्याची शक्यता निर्माण होईल.

साहजिकच, कृष्ण खरंच होऊन गेला की नाही या वादात मी पडत नाही. माझे काम सोपे करण्यासाठी माझ्या कल्पनाविश्वातला, मला भावलेला कृष्ण हाच खरा कृष्ण असे मी मानतो. सुदैवाने, मला फार कल्पनारंजन करावे लागत नाही. व्यासांनी कृष्णाच्या रूपात एक  अद्भुत आणि अतिशय मनमोहक व्यक्तिरेखा निर्माण करण्याचे उत्कृष्ट कार्य केले आहे. व्यासांनी केलेल्या कृष्णाच्या चित्रणाशी जिथे मी सहमत आहे तिथे काहीच प्रश्न उद्भवत नाही. जिथे मला ते चित्रण कमकुवत किंवा अप्रिय वाटते (अर्थात पूर्णपणे माझ्या मते), तिथे मी त्याकडे दुर्लक्ष करण्याचा निर्णय घेतो, म्हणजेच ते माझ्या कृष्णाच्या प्रतिमेतून काढून टाकतो. इतके माझे समीकरण साधे-सोपे आहे.

व्यासांनी कृष्णाभोवती गुंफलेली प्रत्येक कथा मला आवडते. या कथा मनोरंजक, प्रेरणादायी आणि ज्ञानवर्धकही वाटतात. पण मला सर्वात जास्त रस आहे एक व्यक्ती म्हणून असलेल्या कृष्णाच्या गुण आणि स्वभावविशेषात. त्याने केलेल्या चमत्कारांमध्ये किंवा त्याला बहाल केलेल्या अलौकिक दर्जात, देवत्वात नाही.

## कृष्णाचे गूढ

लोक कृष्णाचे वर्णन करण्यासाठी सर्व प्रकारच्या रूपकांचा वापर करतात. काहींना तो निळ्या आकाशासारखा वाटतो – अनंत आणि सर्वव्यापी. काहींसाठी तो अद्भुत संगीतकार आहे ज्याच्या संगीतामुळे या जगात चैतन्य निर्माण होते. काहींसाठी तो निर्मळ झरा आहे कधीही न संपणाऱ्या आनंदाचा.

कृष्णाचे व्यक्तिमत्त्व सामान्य माणसांच्या चौकटीत बसवणे कठीण आहे. त्याचे काही गुणविशेष, मला भावलेले पैलू मांडण्याचा हा माझा नम्र प्रयत्न आहे.

### *कृष्ण सर्वप्रकारे मुक्त होता*

कृष्णाच्या आधीचा विष्णूचा अवतार राम हा निर्बंध पाळणारा, मर्यादांमध्ये वागणारा होता. रामाने कायद्याचे पालन अगदी शब्दशः केले. त्याने सर्वच नीतीनियमांशी स्वतःला जखडून घेतले. त्याने त्याचा धर्म अगदी सर्व बाराकाव्यानिशी पाळला. जणू सर्वांना आदर्श घालून द्यायलाच त्याचा अवतार झाला होता! एका विक्षिप्त नागरिकाचा हट्ट पूर्ण करण्यासाठी त्याने स्वतःच्या लाडक्या सीतेला जंगलात पाठवले, कारण राजधर्म म्हणून त्याच्याकडून हेच अपेक्षित होते!

कृष्ण मात्र अनिर्बंध होता. खऱ्या अर्थाने आणि सर्व प्रकारे मुक्त होता. संपूर्ण महाभारतात तो सर्वत्र मुक्तपणे फिरतो, त्याच्या युक्त्या आणि डाव खेळतो, लोकांना भेटून त्यांच्या विविध समस्या सोडवतो. त्याला कुणीच निर्बंध घालू शकत नाही, अटकाव करू शकत नाही. क्षुद्र मानवनिर्मित नियमांना तो बांधील नव्हता. एव्हढेच काय तत्कालीन धर्माच्या मर्यादा आणि त्यामुळे निर्माण होणारे विरोधाभास यांपासून देखील तो दूर राहिला.

### *सर्वत्र सहभागी असूनही तो अलिप्त होता*

सर्व हिंदू देवता किंवा विष्णूचे बाकीचे अवतार यांच्या तुलनेत, कृष्ण सामान्य माणसांच्या जगात, त्यांच्या व्यवहारांमध्ये सर्वात जास्त सहभागी होता. संपूर्ण महाभारतात त्याची उपस्थिती, त्याचा वावर सर्वत्र आहे. महाभारतातील प्रत्येक व्यक्तीच्या जीवनाला – मग तो शत्रू असो वा मित्र, सज्जन असो वा दुर्जन – कृष्णाचा स्पर्श आहेच. सामान्य माणसाच्या सर्व भूमिका त्याने साकारल्या – भाऊ, मुलगा, विद्यार्थी, मित्र, प्रियकर, शिक्षक, गुरू, समुपदेशक इत्यादी. यातील प्रत्येक भूमिका त्याने पूर्णतः समरस होऊन, पूर्ण सहभाग देऊन साकारली. आणि तरीही तो आयुष्यभर कोणातही किंवा कोणत्याही ठिकाणी फार काळ गुंतून राहिला नाही. प्रत्येक अनुभव तो पूर्णतः, अंतर्बाह्य जगला. सर्वांसाठी त्याच्या हृदयाची दारे खुली होती. त्याची युक्त्यांची पोतडी तो सर्वांसाठी उघडत राहिला. पण महासागरात मिसळून गेलेल्या पण तरीही आपला वेगळेपणा जपणाऱ्या तेलाच्या थेंबाप्रमाणे कृष्णाचा गाभा अबाधित राहिला. भेटलेल्या लोकांमुळे किंवा आलेल्या अनुभवांमुळे त्याच्यावर विपरीत परिणाम झाला नाही. सामान्य माणूस किंवा अगदी ऋषीमुनीसुद्धा सहसा अनुभवांतून शिकतात, ज्ञान संपादन करतात. पण कृष्ण प्रौढावस्थेत जितका ज्ञानी होता तितकाच किशोरवयातही होता. आपल्या जीवनप्रवासात जो भेटेल आणि रस दाखवेल त्याला तो आपले मौलिक सल्ले देत गेला.

## कृष्णाचे स्त्रियांबरोबरचे नाते

स्त्रियांबरोबर कसे वागावे यासाठी कृष्ण हा सर्व पुरूषांसाठी आदर्श आहे. कृष्णाने त्याच्या आयुष्यात आलेल्या सर्व स्त्रियांना अत्यंत आदरपूर्वक व प्रेमाने वागवले, त्यांची काळजी घेतली, त्यांचा मान जपला. प्रत्येकीला तिच्या क्षमतेनुसार आणि कोणतीही अपेक्षा न ठेवता प्रतिसाद दिला. काही टीकाकारांनी आरोप केल्याप्रमाणे कृष्ण हा कॅसानोव्हा नव्हता – आयुष्यात कधीच तो "लाईन मारत" फिरला नाही. सर्व स्त्रिया त्याच्याकडे उत्स्फूर्तपणे आल्या आणि त्याने त्यांचे नेहमीच सन्मानाने आणि मैत्रीपूर्वक स्वागत केले.

कृष्णाने प्रत्येक नाते – खरे तर मला कनेक्शन हा शब्द जास्त समर्पक वाटतो – जगापासून दूर, एका अदृश्य विश्वात ठेवले व जपले. जिथे त्या स्त्रीला सुरक्षित वाटे व ती निःशंक मनाने, समरस होऊन, तिच्या इच्छेनुसार त्या कनेक्शनचा आनंद घेऊ शके. त्या विश्वात कृष्ण खरोखर आणि पूर्णपणे तिचा असे आणि ती त्याची. त्या विश्वात सर्व बंधने – वास्तविक आणि कल्पितदेखील – गळून पडत. संस्कारदोष आणि पूर्वग्रह नाहीसे होत. कृष्णाच्या प्रेमात पडल्यावर दुसरा मार्गच नव्हता!

आणि त्या विश्वाच्या बाहेर असताना, दोघांपैकी कोणीच एकनिष्ठा (loyalty), मालकी (possessiveness) यासारख्या सर्वसामान्य संकल्पनांना बळी पडत नसत. एकमेकावर नात्याचा दबाव आणत नसत. स्वतःचे वेगळे विश्व मुक्तपणे जगत असत.

## कृष्णाची सखी असणे म्हणजे काय होते?

मी स्वतः एक सामान्य पुरूष असल्याने, कृष्णाची मैत्रीण किंवा सखी असण्यात काय विशेष होते (किंवा आहे) हे माहित असल्याचा दावा मी करू शकत नाही. पण इतर अनेक लेखिका आणि कवयित्रींनी व्यक्त केलेल्या विचारांचा आधार घेऊन आणि माझी स्वतःची कल्पनाशक्ती पणाला लावून, मी या विलक्षण घटनेचे वर्णन करण्याचा प्रयत्न करणार आहे, नव्हे ते धाडस करणार आहे.

कृष्णाशी असे निकटचे नाते असलेल्या स्त्रीचे आयुष्य अनोख्या अनुभवांनी समृद्ध होऊन जाई. तिला कृष्णाचे गुणविशेष अतिशय आकर्षक, सुखदायक आणि हृदयस्पर्शी वाटत. त्याच्या संगीताची आणि खेळकरपणाची तिला भुरळ पडे. कृष्णाच्या सहवासात तिच्या स्त्रीत्वाचा तिला अभिमान वाटे, स्त्री असल्याचा आनंद होई. कारण कृष्ण तिच्या स्त्रीसुलभ विचारांचा अथवा भावनांचा नेहमीच आदर करत असे. स्वतःचा पुरूषी दृष्टीकोन लावून उपमर्द करत नसे. अगदी मोकळेपणाने स्वतःचे अगदी जिव्हाळ्याचे विचार ती त्याच्यापाशी व्यक्त करू शके. कृष्णाच्या मैत्रीतून तिला तिच्या इच्छा-आकांक्षांचा, सर्जनशीलतेचा पूर्ण उत्साहाने पाठपुरावा करण्याची प्रेरणा मिळत असे. आयुष्यातील इतर भूमिका सक्षमपणे पार पाडण्यासाठी आवश्यक असलेला दिलासा व आधार मिळत असे.

## कृष्णाची सखी असणे सहज-सोपे नव्हते.

कृष्ण हा सर्वसाधारण नियमांनी बांधलेला सामान्य माणूस नव्हता. कृष्णाची मैत्रीण व्हायचे असेल तर तुम्हाला कृष्ण हे एक जागृत स्वप्नच आहे हे समजून घेणे आणि ते स्वीकारणे आवश्यक होते. तुम्ही जागृतावस्थेत त्याला पाहू शकत व अनुभवू शकत होता. परंतु त्याला पकडून ठेवू शकत नव्हता. त्याच्यावर आधिपत्य गाजवायचा प्रयत्न न केल्यास तो तुमचाच होता. तुमची प्रत्येक इच्छा आणि स्वप्न तो पूर्ण करी, पण तुम्ही त्याच्याकडे हक्काने मागणी केली नाही तरच. कोणत्याही पारंपारिक भूमिकेत तुम्ही कृष्णाला बंदिस्त करू शकत नव्हता. कृष्णाची सखी होण्यासाठी तुम्हाला धैर्यवान आणि साहसी असणे आवश्यक होते. निःशंक होऊन पंख पसरवायचे आणि कृष्णाच्या भरवशावर मुक्त भरारी घ्यायची!

कृष्ण हा प्रत्येक क्षणाचा राजा होता, त्या त्या क्षणातच राहणारा होता. त्याचे सारे चित्त त्या क्षणी त्याच्याबरोबर असलेल्या व्यक्तीकडे असे. काळाचा काटा पुढे सरकला की कृष्णही त्याच्याबरोबर पुढे प्रवास चालू ठेवी. वृंदावन सोडल्यानंतर राधा त्याच्या भूतकाळाचा एक भाग बनली; त्यानंतर त्याने तिच्या आयुष्यात ढवळाढवळ करण्याचा प्रयत्न केला नाही. त्यांचे सुंदर नाते त्यांच्या अंतःकरणात कायमचे होते, अबाधित होते आणि सामान्य लोकांचे सांसारिक अपेक्षांचे ओझे त्या नात्यावर लादले गेले नाही.

## कृष्णाचे नाव आता प्रतीकात्मक झाले आहे.

प्रत्येक स्त्री आपल्या कृष्णाच्या शोधात असते. कृष्णासारखेच त्या पुरूषाने आपल्याला आदराने, प्रेमाने, सखीसारखे वागवावे अशी तिची अपेक्षा असते. आणि प्रत्येक पुरूषाला आपल्या स्त्रीसाठी कृष्ण होण्याची संधी असते. कृष्ण खरोखरच पुरुषांसाठी एक उत्तम आदर्श आहे – पण कृष्णाला असंख्य मैत्रिणी होत्या म्हणून नव्हे!! असा विचार करण्याऱ्या पुरुषांना मी असे म्हणेन की तुम्ही तुमच्या आयुष्यात आलेल्या एका स्त्रीला जरी "मला माझा कृष्ण मिळाला" असे समाधान देऊ शकलात तरी ती तुमची मोठी कमाई ठरेल.

सध्याच्या स्त्रीजागृतीच्या युगात पुरूषजात कोंडीत सापडली आहे असे मला वाटते. शतकानुशतके चालवून घेतलेली पुरूषांची अरेरावी आणि अन्याय खपवून घेणे तर दूरच राहिले, आता स्त्रिया "नकोच ती ब्याद, त्यापेक्षा मी एकटी राहीन किंवा सोबतीसाठी कुत्रा/मांजर पाळीन" अशा भूमिकेप्रत आल्या आहेत. पुरूषांनी कृष्णाचा आदर्श समजून घेण्याची व त्यातून धडे शिकण्याची अधिकच निकड निर्माण झाली आहे.

## कृष्णाचे स्वभावविशेष आणि जीवनविषयक तत्त्वज्ञान

कृष्णाची नीतीमूल्ये आणि नैतिकतेचे नियम बऱ्याचदा अनपेक्षित वाटतात आणि सामान्य माणसाला गोंधळात टाकतात. कृष्णाच्या अनोख्या नैतिकतेला एक नाव देखील आहे: कृष्णनीती. पारंपारिक नीतीरक्षक या नीतीकडे पाहून बऱ्याचदा नाके मुरडतात: राधेसोबतच्या प्रेमाला ते विवाहित स्त्रीशी असलेला अनैतिक संबंध म्हणतात. रुक्मिणीने प्रेमपत्र लिहिले म्हणून तिला घेऊन पळ काढल्याबद्दल त्याला भेकड म्हणतात. आणि शत्रूंचा नाश करण्यासाठी त्यांची फसवणूक केली आणि तशी करण्यास इतरांनाही प्रोत्साहन दिले म्हणून त्याला कपटी म्हणतात.

पण तुम्ही कृष्णाला सर्व बाजूंनी समजून घेण्याचा प्रयत्न केलात, त्याचे अंतरंग आणि त्याच्या वैयक्तिक तत्त्वज्ञानाची मूलभूत तत्त्वे समजू शकलात तरच कदाचित तुम्ही कृष्णनीतीचे गूढ समजू शकता, तिचे सामर्थ्य जाणू शकता. मला कृष्णनीती समजली आहे असे म्हणणे अर्थातच धार्ष्ट्याचे होईल. पण तरीही तिचे काही कंगोरे समजून घेण्याचा हा माझा प्रामाणिक प्रयत्न.

कृष्णाने आपले जीवन इतरांना प्रेरणा देण्यात, त्यांना समर्थ, सक्षम बनवण्यात, शक्य तिथे शिष्टाई करून वाद मिटवण्यात, राजांचे राज्याभिषेक करण्यात कारणी लावले. तो लहान-लहान युक्त्या खेळला आणि मोठे, गुंतागुंतीचे खेळही खेळला. परंतु त्याने स्वतःच्या वैयक्तिक फायद्यासाठी काहीही केले नाही. त्याला अनेक राज्यांवर राज्य करण्याची संधी चालून आली, पण त्याने नेहमीच एखाद्या सक्षम व्यक्तीला अधिकारी बनवले आणि आपण स्वतः राज्याच्या मोहापासून दूर राहिला. कृष्णाचे जीवन म्हणजे एका पाठोपाठ केलेल्या साहसांची, धाडशी उपकथांची मालिका होती. पण तो जरूरीपेक्षा जास्त वेळ एका ठिकाणी राहिला नाही. त्याच्यासाठी विश्रांतीची जागा – दोन उपकथांच्या मधल्या अल्प काळातली – एकच होती. त्याच्या प्रेयसीचा प्रेमळ सहवास. जिथे तो राजेरजवाड्यांच्या कारस्थानांबद्दल किंवा सामान्य माणसांच्या असंख्य सांसारिक समस्यांबद्दल चिंता न करता खरोखर विश्रांती आणि शांतीचा लाभ घेऊ शके.

कृष्णाने जेव्हा जेव्हा आपली मदत देऊ केली तेव्हा तेव्हा ती बहुतेक वेळा सल्लामसलत किंवा "सुचवेन युक्तीच्या गोष्टी चार" अशा रूपात असे; हिंसक, विध्वंसक शक्तीच्या रूपात नाही. महाभारत युद्धाच्या काळात जेव्हा अर्जुन आणि दुर्योधन दोघेही कृष्णाकडे युद्धप्रयत्नात मदतीसाठी आले तेव्हा कृष्णाने त्यांना एका बाजूला त्याचे संपूर्ण सशस्त्र सैन्य आणि दुसऱ्या बाजूला स्वतः कृष्ण – पण पूर्णपणे निःशस्त्र – असे पर्याय दिले. शस्त्रहीन कृष्णाची मागणी करण्याइतका अर्जुन अर्थातच शहाणा होता.

कृष्ण दयाळू आणि उदार अंतःकरणाचा होता परंतु बावळट अथवा अविवेकी नव्हता. त्याने कोणावरही आपले प्रेम, चांगुलपणा किंवा मदत लादली नाही. तसेच कोणालाही आपला गैरफायदा घेऊ दिला नाही. एखाद्या X-ray यंत्राप्रमाणे त्याने प्रत्येकाचे अंतरंग समजून घेतले आणि प्रत्येक व्यक्तीशी त्याच्या क्षमतेनुसार आणि गुणवत्तेनुसार संवाद साधला. कृष्णाला बऱ्यावाईटाची अचूक समज होती. अगदी थोर किंवा वयाने ज्येष्ठ लोकांमधेही दोष असतात याची त्याला जाणीव होती. कोणामध्ये सुधारणा होण्याची शक्यता व क्षमता आहे याचा त्याला सहज अंदाज होता. महाभारतातील असंख्य पात्रे व कृष्ण यांच्यातील परस्परसंवादाच्या व संबंधाच्या कथा केवळ विस्मयकारक आहेत. त्यातली प्रत्येक कथा कृष्णाच्या संवादकौशल्याचा पुरावा तर देतेच, शिवाय मानवी स्वभाव आणि परिस्थिती यांचे त्याला किती अचूक ज्ञान होते हेही दाखवून देते.

## कृष्ण एक मुत्सद्दी राजनीतीज्ञ

महाभारतातील कृष्णाचे राजकीय कारनामे वाचताना तो अतिशय धोरणी व डावपेचामध्ये कुशल होता असे दिसते. साक्षात विष्णूचा अवतार असल्याने तो “सर्वशक्तिमान” असतो व त्याला पाहिजे ते करू शकतो, असे असले तरी खुद्द व्यासांनी कृष्णाच्या अलौकिक दैवी शक्तींचा उपयोग खूपच थोड्या प्रमाणात केला आहे. उलट एक मर्त्य मानव या नात्याने केवळ त्याच्या बुद्धीचाच वापर सर्वत्र करताना दाखवले आहे.

जरासंधाची कथा याचे उत्तम उदाहरण आहे. जेव्हा जरासंधाचा पाडाव करण्याची चर्चा होते तेव्हा कृष्ण युधिष्ठिराला समोरासमोर संघर्ष टाळण्याचा सल्ला देतो. त्याच्या म्हणण्यानुसार “जरासंधाचे सैन्य इतके शक्तिशाली आहे, की त्याला सरळ युद्धात पराभूत करणे अशक्य आहे.” त्याऐवजी "मोजक्याच लोकांनी जरासंधाच्या राजवाड्यात मागच्या दाराने प्रवेश करावा आणि त्याला एकास-एक द्वंद्वयुद्धाचे आव्हान द्यावे,” अशी कृष्ण शिफारस करतो. कृष्ण त्या मोजक्या लोकांत स्वतःलाही सामील करतो. मग तो युधिष्ठिराला असेही सांगतो, “जरासंधाचा वध केल्यावर जर त्याच्या सैनिकांनी आम्हाला हल्ला करून ठार मारले, तरी हरकत नाही. कारण एका शक्तिशाली शत्रूचा आणि नराधमाचा नाश झाला असेल आणि त्यासाठी ती किंमत कमीच आहे.” प्रत्यक्षात सुदैवाने असे काही न होता कृष्ण, भीम आणि अर्जुन जरासंधाचा वध करून सुरक्षित परततात.

मला बऱ्याचदा असे वाटून जाते की जरासंधाची ही कहाणी कदाचित शिवाजीमहाराजांसाठी प्रेरणादायक ठरली असेल काय?! शिवाजीमहाराजांनी असाच शाइस्तेखानाच्या प्रचंड सैन्याबरोबर समोरासमोर संघर्ष टाळला व काही निवडक कमांडोंसह खानाच्या महालात मध्यरात्री प्रवेश करून शाइस्ताखानावरच हल्ला केला.

## समारोपाचे शब्द

कृष्णाच्या व्यक्तित्वाची परिमाणे अनंत आहेत. त्याची जनमानसावरील जादू अलोट आहे. असंख्य कलावंतांनी, लेखकांनी, कवींनी आणि तत्त्वज्ञांनी त्यांचे कलाकसब पणास लावून कृष्णाची व्यक्तिरेखा चितारण्याचा प्रयत्न केला आहे. आणि तरीही तो अथांग, गूढ, आकलनाच्या पलीकडे आहे. कृष्णाला शब्दांत जमेल तसे रेखाटण्याचा हा माझा नम्र प्रयत्न आहे. मला कृष्णाचे व्यक्तिमत्व इतके आकर्षक आणि मनमोहक का वाटते हे स्वतःसाठी समजून घेण्याची ही धडपड आहे.

*लेखक: अभय जोशी (abjoshi@yahoo.com)*
*Last updated: 7 November 2022*